
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र | सोमवार दि.१६ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१०८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन



**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)**–जगप्रसिद्ध तबलावादक आणि पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाले. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत झाला. उस्ताद झाकीर हुसेन यांना १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.झाकीर हुसेन यांना तीन ग्रॅमी पुरस्कारही मिळाले होते. त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अल्लाह रक्खा कुरेशी आणि आईचे नाव बीवी बेगम होते. झाकीर यांचे वडील अल्ला राख हेही तबलावादक होते. झाकीर हुसेन यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील माहीम येथील सेंट मायकल स्कूलमधून झाले. याशिवाय मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधूनही पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले होते.

# नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी

## नागपुरात ३९ जणांचा शपथविधी; भुजबळ, केसरकरांना डच्चू

**नागपूर (वृत्तसंस्था)**–अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षित विस्तार आज नागपुरातील राजभवनात झाला. भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ अशा ३९ आमदारांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ देवविली. मंत्रिमंडळात २५ नवे चेहरे असून आधीच्या मंत्रिमंडळातील छगन भुजबळ, दीपक केसरकर यांच्यासह ११ जणांना डच्चू देण्यात आला आहे. खातेवाटप दोन ते तीन दिवसांत जाहीर करणार असल्याचे शपथविधीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी जाहीर केले.

सोमवारपासून (ता. १६) हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर १० दिवसानंतर मंत्रिमंडळ विस्तार झाला आहे. मंत्रीमंडळाच्या विस्ताराचा मुहूर्त तीनदा टळल्यानंतर आज मुहूर्त साधला. आज शपथ घेतलेल्या ३९ मंत्र्यांपैकी ३३ कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्री आहेत. मंत्रिमंडळात



चार महिलांचा समावेश असून त्यात दोन मंत्री आणि दोन राज्यमंत्री आहेत. भविष्यात आणखी काही महिलांना स्थान देऊ, असे फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

दुपारी चार वाजता राजभवनातील हिवरळीवर मंत्र्यांच्या कार्यकर्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळ्याला प्रारंभ झाला. सर्वप्रथम भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंशेखर बावनमुळे, दुसऱ्या क्रमांकावर राधाकृष्ण विखे पाटील आणि तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादीच्या हसन मुश्रीफ यांनी शपथ घेतली. मंत्रिमंडळात २५ नवे चेहरे आहेत. सर्वांनाच संधी देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. मंत्रिमंडळात स्थान न मिळालेल्या नेत्यांपैकी काही अपवाद वगळता अनेक जणांना त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे संधी न मिळाल्याची चर्चा आहे. एकूण २१ जिल्ह्यांना मंत्रिपद मिळाले असून १५ जिल्ह्यांची ही संधी हुकली आहे. पुणे आणि सातारा या दोन जिल्ह्यांना सर्वाधिक चार मंत्रिपदे मिळाली आहेत. एकही मंत्रिपद न दिल्याबद्दल आणि शपथविधीलाही निमंत्रण न दिल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) नेते रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, हे सरकार शेतकरीविरोधी असून खुनी असल्याने महाविकास आघाडीने आजच्या चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतल्याचे विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी येथे केले.

### कोणी घेतली मंत्रिपदाची शपथ ?

**भाजपः** चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, मंगलप्रभात लोडा, जयकुमार रायल, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक उईके, आशिष शेलार, संजय सावकारे, नितेश राणे, आकाश फुंडकर, माधुरी मिसाळ राज्यमंत्री पंकज भोयर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**शिवसेना–** गुलाबराव पाटील, दादा भुसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, आशीष जैस्वाल– राज्यमंत्री योगेश कदम – राज्यमंत्री

**राष्ट्रवादी–**हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवळ मकरंद, जाधव बाबासाहेब पाटील, इद्रनील नाईक.

## गावाला शाळेचा अभिमान शाळेला गावाचा अभिमान




**सोलापूर । विश्वास चोपडे**

या उक्तीला साजेसे तंतोतंत जुळणारे गाव म्हणजे कव्हे, सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील सीना नदीकाठी वसलेले कव्हे हे गाव, कव्हे गावामध्ये इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत जिल्हा परिषदेची शाळा आहे, लहान मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून कव्हे गावामध्ये एकूण सहा अंगणवाडी आहेत, माध्यमिक शिक्षण सहज व सुलभ व्हावे म्हणून प्राथमिक शाळेच्या जवळच प्रबोधनकार ठाकरे माध्यमिक विद्यालय आहे, शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२५ मध्ये जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन केले होते, या परीक्षा अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा हा एक स्पर्धेचा प्रकार होता. या स्पर्धा परीक्षेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळाकव्हे येथील दोन विद्यार्थिनी सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेल्या आहेत मोठ्या गटातील विद्यार्थिनी कुमारी स्नेहा नागेश मोरे व लहान गटातील विद्यार्थिनी कुमारी ईश्वरी नागेश ढेरे या दोन्ही विद्यार्थिनींनी शिक्षकांच्या व पालकांच्या योग्य मार्गदर्शना मुळेच जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाने यश मिळवलेले आहे. कोणतेही वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून व राजकीय विचार श्रेणी शालेय परिसरामध्ये न आणता शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सदस्य शिक्षण तज्ञ गावातील प्रतिष्ठित नागरिक गावातील पत्रकार बंधू शालेय व्यवस्थापन समिती सचिव व शाळेतील सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी या दोन विद्यार्थिनींचा ज्यांनी कव्हे गावाची प्रसिद्धी सोलापूर जिल्ह्यामध्ये केली या यशवंत विद्यार्थिनींचा रोख रक्कम हार पुस्तके देऊन यथोचित गौरव केला या सन्मान सोहळ्यासाठी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या विस्ताराधिकारी आदरणीय लोंढे मॅडम देखील उपस्थित होत्या म्हणूनच म्हणतात ना गावाला शाळेचा अभिमान, शाळेला गावाचा अभिमान लेखक,श्री रणजीत देविदास शेळके, विषय शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कव्हे तालुका माढा जिल्हा सोलापूर.

## महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार:मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याच्या अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बिकेसी,वांद्रे येथे १३ ते १५ डिसेंबर रोजी वर्ल्ड हिन्दू इकनॉमिक परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी वर्ल्ड हिन्दू इकनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमचे अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी.व्ही.मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र येणाऱ्या काळात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनोमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आधारित विकासाच्या तत्वावर आधारित विकास करण्याच्या वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत.पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्यात मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृती मध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो असे आहे. तर हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आहे भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताचा विकास हा मुंगीच्या पावलांनी सुरू आहे असं म्हटलं जायचं.भारताचे अर्थव्यवस्था ही जगात न टिकणारी आहे असा लोकांचा समज होता. मात्र आजच्या भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारी भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे.जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो ? पण देशातील उपलब्ध मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे चालला आहे. महाराष्ट्र राज्याला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी एक सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या सल्ल्याने महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा आम्ही अभ्यास केला. यावर आधारित महाराष्ट्र राज्याच्या विकासाची धोरण बनवले आहेत. विकासाची गती मध्ये जागतिक पातळीवरती महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे.

## मला पदमुक्त करा, प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करा:नाना पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**–काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या हाराकिरीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून आपल्याला पदमुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या प्रदेशाध्यक्षपदाला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून मला पदमुक्त करा, असे ते आपल्या पत्रात म्हणाल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेत काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागा मिळाल्या. त्यात काँग्रेसला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर आता काँग्रेसमध्ये या पराभवाची चिरफाड सुरू झाली आहे. त्यानुसार नाना पटोले यांनी शुक्रवारी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे आपल्याला पदमुक्त करण्याची मागणी केली आहे.मी मागील ४ वर्षांपासून काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष आहे. लोकसभा निवडणुकीत माझ्या नेतृत्वात राज्यात काँग्रेसला चांगले यश मिळाले. पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे मला आता सर्व जबाबदारीतून मुक्त करावे, असे नाना पटोले यांनी आपल्या पत्रात म्हटल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. नाना पटोले यांनी प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून नवा प्रदेशाध्यक्ष नियुक्त करण्याची विनंतीही आपल्या पत्राद्वारे केली आहे.



## सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू वेदनादायी-प्रकाश आंबेडकर

### पोस्टमॉर्टमचे चित्रीकरण करावे



**मुंबई । प्रतिनिधी**

परभणीत वडार समाजातील भीमसैनिक – सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे, हे अत्यंत वेदनादायक आणि दुःखद आहे. त्यांचा जामीन अर्ज मंजूर होऊनही न्यायालयीन कोठडीतच त्यांचा मृत्यू झाला, हे वेदनादायक असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

आंबेडकर यांनी म्हटले आहे की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला असल्याने, आमचे वकील न्यायालयाला विनंती करतील की पोस्टमॉर्टम (सीटी स्कॅन, एमआरआय, फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजिकल) तपासणी फॉरेन्सिक विभाग असलेल्या सरकारी रुग्णालयातच केली जावी. याचे चित्रीकरण करण्यात यावे. फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजी या दोन्ही विभागांच्या देखरेखीखाली पोस्टमॉर्टम केले जावे.

## शेतकऱ्यांची कर्जमाफी,महिलांच्या खात्यात २१०० रुपये कधी देणार?

### अंबादास दानवे यांचा सवाल; हनुमान मंदिरावरून सोमय्यांवर निशाणा

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**– महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी आणि लाडकी बहिण योजनेमध्ये महिलांच्या खात्यात २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे आता आम्ही या दोन्ही घोषणांची वाट पाहत असल्याचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून दानवे यांनी नागपूर अधिवेशनात सरकारला घेरण्याचा इशारा दिला आहे.राज्य सरकार हमी भावाला मुदतवाढ देत आहे. मात्र, कुठेही खरेदी केंद्र चालू नाही. त्यामुळे हमी भावाला मुदतवाढ देऊन काय उपयोग? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. या माध्यमातून दानवे यांनी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्याची तसेच शेतकऱ्यांकडून माल खरेदी करायची मागणी केली आहे. दादर येथील रेल्वे स्थानकावर असलेले हनुमान मंदिराचा मुद्दा देखील सध्या राज्यात गाजत आहे. भाजप स्वतःला हिंदुत्ववादी म्हणते. आणि दादर येथील ८० वर्षे जुन्या मंदिराला नोटीस दिली जात असल्यावरुन अंबादास दानवे यांनी भाजपवर टीका केली. किरीट सोमय्या यांनी हनुमान मंदिराच्या दर्शनला जाण्यापेक्षा त्यांच्या स्वतःचे पक्षाचे राज्यात आणि केंद्रात सरकार आहे. त्यांनी सरकारला याबाबत जाब विचारावा, असे आवाहन देखील दानवे यांनी केले आहे.राज्यांमध्ये २३ तारखेला सरकारला बहुमत मिळाले आहे. मात्र तब्बल २० दिवस झाल्यानंतर देखील अद्याप पूर्ण मंत्रिमंडळ नाही. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. मात्र उपमुख्यमंत्र्यांकडे कोणत्याच खात्याचा कारभार नाही. अशा पद्धतीने या राज्याचा कारभार चालू आहे. केवळ मंत्रिमंडळ विस्ताराच्या तारखा समोर येत आहेत. त्यामुळे खरे खोटे हे केवळ मोदी आणि शहा यांनाच माहिती असल्याचे अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.महाविकास आघाडीच्या विधानसभा निवडणुकीत जागा कमी झाल्या असल्या तरी देखील राज्यातील जनतेसाठी आमचा लढा सुरू राहणार असल्याचे अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

### चौसाळा येथे ना. पकंजाताई मुंडे व ना.धनजंय मुंडे यांची मंत्रीपदी वर्नी लागताच

## भाजपच्या वतीने १००० हजार तोफांची सलामी देवून आंनदोत्सव साजरा





**बीड । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव ना.पकंजाताईसाहेब मुंडे व ना.धनजंय मुंडे साहेब यांनी महायुती सरकार मध्ये कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेताच बीड तालुक्यातील चौसाळा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने १००० हजार तोफांची सलामी देवून व एकमेकांना पेढा भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला यावेळी भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर,भाजपा अल्पसंख्याक बीड तालुका अध्यक्ष सलीमभाई जहागिरदार,कानडीघाटचे उपसरपंच आप्पासाहेब झोडगे,वामन मुंडे,हिगंणीचे माजी सरपंच भागवत आंधळे, महादेव चौधरी,सचिन आंधळे,सचिन सोनवणे,सिध्देश्वर गिरी,कल्याण बारवकर,अक्षय माळी यांच्यासह भाजपा पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थीत होते.

## संपादकीय..

# पक्षीही सुस्वरे आळविती...



एक घटना आजही आठवते, १९७४ मधली. खेड तालुक्यातील, बोरघर गावी (जिल्हा रत्नागिरी) आमचं किराणा मालाचं दुकान होते. नदीच्या पलीकडे आदिवासी वस्ती होती आणि कातकरी बायका आमच्या दुकानात अधूनमधून जीवनावश्यक वस्तू घ्यायला यायच्या. परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने दुकानात आल्यानंतर वस्तू मागायच्या त्या अशा : भाय, चार आण्याचं खोबरेल तेल, आठ आण्याचं गोडंतेल, चार आण्याचं खोबरं द्या. माझ्या डोळ्यात अक्षरशः अश्रू उभे राहायचे.

कातकरी बायकांनी मागितलेलं मी द्यायचो, पण हक्कानं आणखी थोडं द्या, असं सांगायच्या आणि त्यांची हक्काची मागणी पूर्ण करताच त्यांच्या चेहऱ्यावर अवतरलेलं स्मितहास्य पाहून मला आनंद व्हायचा. हे अनमोल क्षण म्हणजे आनंदाचा ठेवाच ! बालपणीचा काळ सुखाचा असं म्हणतात ते उगीच नव्हे. बालपणी आम्ही तीन–चार मित्र एखाद्या झुडपाखाली बसून हातात दगडी गोटे टाळासारखे वाजवत घेऊन तुकोबांचे, माऊलींचे अभंग म्हणत भजनाचा आनंद घेत असू. रूप पाहता लोचनी, सुख झाले वो साजणी... माऊलींच्या मुखातून आलेली वाणी गाताना मनाला किती प्रसन्नता लाभायची याचं वर्णन करणं अशक्य आहे. लोखंडी रिंग बनवून तो फिरवण्यासाठी लांबलचक तार घेऊन तिला यू बेंड देऊन लाकडाच्या मुठीत तार बसवून तो गाडा फिरवत फिरवत दूरवर धावत असू. कधी कधी एकत्र येऊन भोवरे फिरवणं, गोट्या खेळणं यात आनंदाची उधळण असे.नदीच्या एखाद्या डोहात डुंबण्याचा आनंद घेणं आणि घरी जाताच आईच्या हातचा मार खाणं, हे नेहमीचं! आमची शाळा घरापासून अगदी जवळ होती. शाळा सकाळची दोन तास असे. या वेळेत लगोर, विटीदांडू, हुतूतू अशा विविध खेळांचा आनंद लुटत असू. शाळेत असताना डिंगणकर माईंच्या शेतातील चिंचा, घराजवळील रायआवळे, तसंच बाबा कानेटकरांच्या परिसरातील काजूचे फळ चोरून खाण्याचा मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थी दशेत असताना गावागावातून, वाडीवाडीतून भटकंती होत असताना तहान लागल्यास एखाद्या गरीब गावकऱ्याच्या घरी गेल्यास होणारं आदरातिथ्य अवर्णनीय! शेणानं सारवलेल्या पडवीत बसण्यासाठी घोंगडी अंथरून होणारं प्रेमळ स्वागत, सोबत चुलीवरील चहा मिळायचा. मनाची श्रीमंती ही आदिवासी आणि खेड्यापाड्यातील गावकरी यांच्याकडूनच अनुभवावी.रिकामं मन हे अनेक समस्यांचं माहेरघर ठरतं, म्हणूनच रोजचा जगण्याचा आनंद घेता यावा म्हणून नवीन घरी बर्ड फीडरमध्ये चिमण्यांसाठी खाणं भरून ठेवलं, पण प्रत्यक्ष चिमण्या यायला सहा महिन्यांची प्रतीक्षा करावी लागली. चिमण्यांच्या बरोबरीनं इतर पक्षीही यायला लागले आणि आमची खिडकी पक्षीदर्शन खिडकी ठरली. पक्षांना खाण्यासाठी आणखी एका ट्रेची वेगळी व्यवस्था केल्याने बुलबुल, साळुंख्या, ठिपकेदार मुनिया, पोपट, मैना, सूर्यपक्षी, दयाळ पक्षी यायला लागले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत खाद्य खाण्यासाठी दररोज येणारे दहा बारा पोपटांचे थवे आनंदात अधिकच रंगत आणतात. पहाटेच्या वेळेस पक्ष्यांचा मंजुळ आवाज विशेषतः दयाळ पक्षाची पहाटेच्या वेळी बाल्कनीत ऐकू येणारी गोड आवाजातील शिळ कानी पडताच मनाला प्रसन्नता लाभते आणि मन ताजंतवानं होतं, याचा अनुभव घेता आला.

रस्ता ओलांडत असताना एखादा वाहनचालक जवळ आल्यास त्याला प्रथम जाण्यास सांगतो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील सुहास्य दोघांच्या मनी आनंदाच्या लहरी निर्माण करतात. निवृत्तीच्या काळात आनंदमयी जीवन जगता यावं यासाठी गृहनिर्माण संस्थेचं कामकाज आणि सभासदांच्या समस्या सोडविण्यावर भर देतो. आनंदाचे क्षण अनुभवता यावे यासाठी आपलाही सहभाग असावा लागतो. आनंदाची देवाण–घेवाण केल्यानेच आनंद घेता येतो. वृत्तपत्रात छापून आलेलं लिखाण, अभिप्राय तसेच समाजमाध्यमांवर पाठवलेल्या लेखनाविषयी अनेकांच्या आलेल्या प्रतिक्रिया आणि वैयक्तिक फोन मनमुराद आनंद देतात.स्वेच्छा–निवृत्तीनंतर मला सामाजिक कार्य, लेखन, बागकाम यांची आवड निर्माण झाली. कुंड्यांमधून रोपांची केलेली लागवड, त्यांची मशागत यामुळं मिळणारा भाजीपाला आपली मेहनत सार्थकी लागल्याचं समाधान देतो. लिंबाच्या आणि कढीपत्त्याच्या रोपांवर फुलपाखरं सतत अंडी घालत असतात. दरवेळी पाच ते सहा फुलपाखरं जन्माला येतात. लिंबाचं आणि कढीपत्त्याचं रोप म्हणजे फुलपाखरांचं प्रसूतिगृह झालं आहे. या सुंदर फुलपाखरांच्या चित्रीकरणात व्यग्र राहण्याची संधी मला निसर्गानं दिली. निसर्गाने माणसांसाठी आनंदाच्या दालनांची मुक्तहस्ते उधळण केली आहे. आपल्याला ती ओळखता आली पाहिजे, तरच 'आनंदाचे डोही आनंद तरंग' याची अनुभूती घेता येईल.

# प्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्यात



एकूणच परिवहन, दळणवळण या क्षेत्रांत गेल्या २५ वर्षांत झालेल्या बदलांचा आढावा घेणाऱ्या लेखमालेतील हा शेवटचा लेख. लेखमालिकेच्या या शेवटच्या भागात दळणवळणाच्या दोन क्षेत्रांविषयी बोलू या. ही दोनही क्षेत्रे अशी आहेत, की ज्यांनी एका अर्थाने जागतिकीकरणाची सुरुवात केली. त्यातील एक म्हणजे नौकानयन (शिपिंग). आणि दळणवळणाचे दुसरे क्षेत्र असे की ज्याच्यामुळे जागतिकीकरणाने खऱ्या अर्थाने 'टेक ऑफ' घेतला. हे दुसरे क्षेत्र म्हणजे अतिशय महत्त्वाचे असे हवाई वाहतूक क्षेत्र. गेल्या २५ वर्षात या दोनही क्षेत्रांत फार मोठे बदल झाले. त्या बदलांना आकार दिला तो भूराजकीय परिस्थितीने, बदलत्या तंत्रज्ञानाने. त्याचबरोबर, शाश्वत विकासाबद्दलचा वाढता आग्रह आणि मध्यंतरी आलेली करोनाची साथ यामुळे देखील या दोन्ही क्षेत्रांत काही आमूलाग्र असे बदल झाले.

गेल्या २५ वर्षांत जलवाहतूक क्षेत्र असो, की हवाई वाहतूक क्षेत्र असो, या दोन्ही क्षेत्रांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांवर खूप भर दिला जात आहे. जगात होणाऱ्या एकूण कार्बन उत्सर्जनात दोन ते तीन टक्के वाटा हा जलवाहतूक क्षेत्राचा आहे. या शतकाच्या सुरुवातीला, या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांना ही बाब जाणवायला लागली होती. प्रदूषण हे फक्त दुचाकी आणि चारचाकी वाहनांमुळेच होत असते, असा एक समज त्याआधी सर्वत्रच दृढ होता. पण जलवाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञ आणि इंटरनॅशनल मेरीटाइम ऑर्गनायझेशन यांनी याबद्दल सर्वसामान्यांमध्ये, तसेच सर्व संबंधितांमध्ये जाणीव, जागरूकता निर्माण करायला सुरुवात केली.इंटरनॅशनल मेरीटाइम ऑर्गनायझेशनने जलवाहतूक क्षेत्रांतील सर्व कंपन्यांना या संदर्भात काही निर्देश दिले. हे निर्देश कुठल्याही परिस्थितीत पाळले गेलेच पाहिजेत, अशी सक्त ताकीद देखील संबंधितांना देण्यात आली. मागच्या शतकात जहाजांमध्ये जे इंधन वापरले जात असे त्या इंधनामध्ये सल्फरचे म्हणजेच गंधकाचे प्रमाण खूप असायचे. त्यामुळे, इंधनातील गंधकाचे प्रमाण कमी असायला हवे, असा सूचनावजा आदेशच इंटरनॅशनल मेरीटाइम ऑर्गनायझेशनने दिला. या सूचनेची/आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी २०२० या वर्षाची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर जहाजांसाठी लिक्विडीफाइड नॅचरल गॅसचा वापर सुरू झाला. सध्याच्या स्थितीकडे पाहिले तर, आत्ता जहाजांसाठी बायोफ्युअल वापरले जाताना दिसते. तसेच, हायड्रोजन इंधनाचा वापर सुरू झाला आहे. इतकेच नव्हे, आता जहाजांना इंधन म्हणून इलेक्ट्रिक बॅटऱ्या वापरण्याचे प्रयोग देखील सुरू झाले आहेत.जलवाहतूक क्षेत्रात इंधनाबाबत जे घडले तेच हवाई वाहतूक क्षेत्रात देखील गेल्या २५ वर्षांत घडले नि आजही घडत आहे. वजनाने हलकी असलेली आणि कमी इंधनात उडण्याची क्षमता असलेली बोईंग ७८७ ड्रीमलाइनर, एअरबस ३५० यांसारख्या विमानांनी या क्षेत्रात प्रवेश केला. कमी इंधनात लांबचा टप्पा गाठण्याची क्षमता या विमानांत आहे. साधारण सन २०१४च्या सुमारास 'सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल' म्हणजे थोडक्यात तेल, वनस्पती, आणि इतर काही घटक यांपासून बनलेले 'एव्हिएशन फ्युएल'बद्दल चर्चा सुरू झाली. त्यानंतर, सन २०१६मध्ये 'इंटरनॅशन सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशन'ने या अशा अपारंपरिक इंधनाचा जास्तीत जास्त वापर करण्यास प्रोत्साहन दिले.वर उल्लेख केल्याप्रमाणे जलवाहतूक व हवाई वाहतूक या क्षेत्रांमध्ये जे काही बदल झाले त्याला काही ठिकाणची भौगोलिक परिस्थिती देखील कारणीभूत ठरली. जगभरात आणि विशेषतः आर्टिक्ट समुद्रात जागतिक तापमानवाढीमुळे बर्फ वितळून नॉर्दर्न समुद्रातून आशिया आणि युरोप यांच्यातील अंतर कमी झाले. त्याचवेळी, सन २०१६मध्ये पनामा कालव्याचे विस्तारीकरण झाल्यामुळे पॅसिफिक समुद्र आणि अटलांटिक समुद्र यांतून होणाऱ्या वाहतुकीचे प्रमाण वाढले.व्यापक दृष्टीने हवाई वाहतूक क्षेत्रात झालेला सगळ्यांत मोठा बदल म्हणजे विमानप्रवास हा सर्वसामान्यांच्या आवाक्यात येणे. मध्यपूर्वेकडील देश आणि आशियातील अनेक देशांमध्ये विमानप्रवास सर्वसामान्यांच्या बऱ्यापैकी आवाक्यात आला. भारतात देखील सन २०००च्या दशकात अनेक विमान कंपन्या आल्या. आयुष्यात एकदा तरी विमानात बसायचे, हे १९९०च्या दशकातील सर्वसामान्य भारतीयांचे स्वप्न असायचे. मात्र हवाई वाहतूक क्षेत्रातील बदलांमुळे विमानप्रवास हे स्वप्न न राहता गरज बनायला लागली. भारतात जेट एअरवेज, डेक्कन एअरवेज, तर आशियात आणि मध्यपूर्वेत कतार एअरवेज, एमिरेट्स, सिंगापूर एअरलाईन्स यांनी देखील विमानप्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणायला सुरुवात केली.या शतकाच्या अगदी सुरुवातीला अमेरिकेत न्यूयॉर्क येथे असलेल्या ट्वीन टॉवर्सवर दहशतवाद्यांनी दोन विमाने धडकवली आणि जगभर हलकल्लोळ माजला. त्या घटनेने हवाई वाहतूक क्षेत्र देखील हादरून गेले. त्यामुळे मग जगभरात विमान प्रवाशांची तपासणी अधिक कडक व्हायला लागली. ती इतकी कडक झाली की, तिचा जाच वाटावा! आज भारतात जरी विमानतळांवर प्रवाशांची प्रत्यक्ष छाननी, तपासणी होत असली तरी तरी अमेरिका आणि युरोपमध्ये अनेक विमानतळांवर फक्त स्कॅनरद्वारे छाननी, तपासणी होते. गेल्या २५ वर्षांतील या क्षेत्रात एक मोठा बदल झाला तो विमानप्रवाशांच्या सेवेत. पहिल्या दशकात अधिकाधिक प्रवाशांना आकर्षित करण्याचा कंपन्यांचा उद्देश असे. त्यासाठी देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांमुळे विमानात प्रवाशांची चंगळ होत असे. मात्र नंतर, त्या खर्चात थेट इतकी काटकसर सुरू झाली की, विमान म्हणजे फक्त वेळेत पोहोचवणारी सेवा! प्रवाशांना पाण्याच्या व्यतिरिक्त काहीही सेवा न देणे यासारखी पावले टाकण्यात आली. भारतात सन २००० ते २०१० या काळात विमानात प्रवाशांना उत्तम खानपान सेवा देण्यात येत असे. पण त्या खर्चाच्या ओझ्याखाली काही विमान कंपन्या पार बुडाल्या. त्यामुळे मग विमानप्रवासातील काटकसरीचे युग सुरू झाले.

किमान भारतात तरी गेल्या २५ वर्षांत अनेक विमान कंपन्या जन्माला आल्या आणि त्यातील कित्येक बुडाल्या देखील. या क्षेत्राबाबतची सरकारची बदलती धोरणे त्यास कारणीभूत होती. त्याचप्रमाणे पुरेशी विमानतळे नसतानाही अनेक विमान कंपन्यांनी विमाने मोठ्या संख्येने आपल्या ताफ्यात आणल्याने गोंधळ सुरू झाला. या सगळ्यात अनेक विमान कंपन्या बुडाल्या.भूराजकीय बदलांनी मात्र जलवाहतूक क्षेत्राला जितके धक्के दिले तितके हवाई वाहतूक क्षेत्राला दिले नाहीत. समुद्री चाच्यांचा उच्छाद गेल्या २५ वर्षांत वाढला. सोमालिया, इंडोनेशिया, बांगलादेशच्या जवळचा चिटगॉन्ग परिसर येथे समुद्री चाच्यांचे नवे तळ उभे राहिले. सन २०२१मध्ये सुएझ कालव्यात एक मोठे जहाज अडकले आणि अनेक आठवडे इकडून जाणारी वाहतूक ठप्प झाली. संपूर्ण जगात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होईल, अशा शक्यतांचा शिपिंग कंपन्यांनी कधी विचारच केला नव्हता, हे त्यातून लक्षात आले. जलवाहतूक क्षेत्रातील गेल्या २५ वर्षांतील आणखी एक बदल म्हणजे 'क्रूझ' प्रवास देखील सामान्यांच्या आवाक्यात आला. क्रूझचा आकार इतका वाढत गेला की ते एक छोटे शहरच बनत गेले. गोल्फ कोर्सपासून थिएटरपर्यंत अनंत सुविधा असलेली क्रूझ म्हणजे जणू छोटे बेटच झाली.जलवाहतूक असू दे की हवाई वाहतूक, या दोन्ही क्षेत्रांना आपण पर्यावरणपूरक व्हावे, हे वाटायला लागणे आणि ही दोन्ही क्षेत्रे सामान्यांना आपलीशी वाटू लागणे, त्यांच्या आवाक्यात येत जाणे या बाबी उल्लेखनीयच. त्याचवेळी, ही दोन्ही क्षेत्रे अतिशय मोठ्या प्रमाणात विस्तारत गेली हे या पाव शतकाचे देणे म्हणता येईल.

# दिवाळी रंगे फराळासंगे...

मी अगदी लहान असेन, दिवाळीसाठी आम्ही बीडला जमा व्हायचो. ताटात भुरभुरलेल्या खसखशीवर आजी अगदी हलक्या हातानं अनारसा थापायची. थापायची म्हणणं चुकीचं ठरेल, कारण ती तिच्या मधल्या तीन बोटांनी घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे हळूहळू अनारश्याच्या पिठाचा छोटा गोळा फिरवायची. तिच्या समोर तिची नातवंडं बसलेली असायची. अनारसे थापणं, वर्तमानपत्राच्या चौकोनी तुकड्यांवर सोऱ्याने चकल्या पाडणं वगैरे कामात आमचा पण सहभाग असायचा. तुपात तळून पाकात घोळवलेले खव्याचे गुलाबजामून एका स्टीलच्या डब्यात ठेवले जायचे आणि थंडी इतकी असायची की ते थिजून एकमेकांना चिकटायचे. पण चव अप्रतिम.मोजका फराळ, मोजके पदार्थ दिवाळीच्या दिवशी सकाळी एका भल्यामोठ्या ताटात ठेवले जायचे आणि दिवाळीसाठी आजीआजोबांकडे जमलेले सगळी मुलं, बाळं, नातवंडं फराळ करायचे. आता जेव्हा मी आठवते तेव्हा आजी दिवाळीचा फराळ करताना (खाताना) कधी मला आठवत नाही. खरं तर ती काही सतत स्वयंपाकघरात जुंपलेली वगैरे नव्हती. तिचं आयुष्य सुटसुटीत होतं; कारण कधी तिने तिच्या गरजा वाढवल्या नाहीत, ना तर कुणाकडून काही अपेक्षा ठेवल्या फारशा. पण दिवाळीच्या काळात फराळाचा व्याप एवढा असणार, की सकाळी निवांत फराळ करायची परिस्थिती नसणार. तुम्ही आठवून पहा, दिवाळीच्या काळात भल्या पहाटे फराळाचं ताट समोर देणाऱ्या आज्या, आया, मावशा, काकी आठवतील; पण अपवाद वगळता या बायका घरातल्या इतर मंडळींचा फराळ झाला, आवराआवरी झाली, की नंतरच निवांत बसत असतील, बहुदा स्वयंपाकघरात, त्यांच्या राज्यात.पुढे आई फराळ बनवताना मोजके पण आवडीचे पदार्थ बनवायची. काही पदार्थ ती घरी बनवायची, तर काही पदार्थ बनवायला कधी कधी आचारी येऊ लागला. घरामागच्या अंगणात एका बर्नरच्या शेगडीवर त्याने आणलेल्या मोठ्या कढया तो ठेवायचा आणि एका दिवसात भराभर पदार्थ बनवायचा. स्टीलच्या किंवा जर्मनच्या मोठमोठ्या डब्यांत तो सामान भरून ठेवायचा. पण काही पदार्थ आईच बनवायची. म्हणजे चकली, लाडू असे तिचे स्पेशल पदार्थ ती बनवायची; तर आचारी शेव, चिवडा वगैरे बनवायचा. बाहेरून पदार्थ विकत घेण्याची फारशी पद्धत नव्हती, त्यामुळे शेव मी पहिल्यांदा आचाऱ्याने, पण घरीच बनवलेली खाल्ली. नंतर तिने स्वतःचाच खाद्यपदार्थाचा व्यवसाय सुरू केला आणि आमच्या घराबरोबरच आजूबाजूच्या अनेक बायकांना फराळ विकत मिळू लागला.

मी अनुभवलेले बदल मला माझ्या आजूबाजूलाही दिसतात. हे स्वाभाविक आहे. पिढी बदलली की पद्धती बदलतात, लोकांचा सणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. दिवाळी साजरी करताना महाराष्ट्राच्या त्या त्या भागात बनणाऱ्या फराळाच्या पदार्थांबरोबरच इतर अनेक प्रकारचे गोड आणि तिखट असे दोन्ही प्रकारचे पदार्थ बनतात. काही पदार्थ घरी बनतात तर काही विकत आणले जातात. नव्या स्वरूपात साजऱ्या होणाऱ्या दिवाळीत घरातल्या महिलेवरचा भार किती कमी झाला आहे, याची फक्त ढोबळ चर्चा न करता त्याला काही आकडेवारीची जोड द्यावी या विचाराने मी आमच्या 'मुंबई स्वयंपाकघर' या फेसबुक समूहावर या संदर्भात काही प्रश्न विचारले आणि त्याला तब्बल अडीच हजारापेक्षा जास्त प्रतिसाद आले. यात काही जणांनी एकापेक्षा जास्त पर्याय निवडले. त्यांनी नोंदवलेली मतं लक्षात घेता महाराष्ट्रातल्या मध्यमवर्गात गेल्या काही वर्षांत दिवाळी फराळाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात झालेले काही बदल लक्षात आले. तसेच ही खाद्यसंस्कृती जपण्यासाठी महिला कसे प्रयत्न करत आहेत हे ही लक्षात आले. पोलमध्ये सहभागी झालेले बहुतेक लोक (स्त्री आणि पुरूष दोन्ही) मध्यमवयीन आहेत. त्यामुळे पुढच्या पिढीची मतं यात समाविष्ट नाहीत.पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या पद्धतीमध्ये आलेला सुटसुटीतपणा वरील तक्त्यातून दिसून येतोय. जितक्या प्रमाणात दिवाळी फराळ फक्त घरी बनतो, तेवढ्याच प्रमाणात थोडे तरी पदार्थ विकत घेणाऱ्यांचं प्रमाण आहे. काही जण फराळाचे सगळेच पदार्थ विकत आणतो, हे सांगत असले तरी, विकत आणतो; पण तरी थोडा फराळ घरी करतोच, हे आवर्जून सांगणाऱ्यांचं प्रमाण फार मोठं आहे.पाचशेच्यावर लोकांनी एका मोठ्या मुद्द्याला निकालात काढलं. घरात एकटी बाई राबते, की सगळेजण मिळून फराळ बनवतात, असा प्रश्न विचारला होता. त्याला मिळालेल्या प्रतिसादावरून लक्षात आलं की, एकहाती फराळ बनवणाऱ्या स्त्रियांपेक्षा जास्त प्रमाण सगळ्यांनी मिळून फराळ बनवणाऱ्या कुटुंबांचं आहे आणि हे चित्र दिवाळीला शोभेल असं प्रसन्न आहे.संपूर्ण फराळ घरी बनवणाऱ्यांनी त्यांची बाजू मांडताना एका महत्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधलं आहे. ते म्हणजे कुटुंबाच्या खास पाककृतींचं महत्त्व. फराळाचे पदार्थ जरी तेच ते असले तरी ते रांधण्याची प्रत्येक कुटुंबाची एक वेगळी पद्धत असते. ही पद्धत विस्मृतीत जाऊ नये म्हणून स्त्रियांनी पिढ्यानपिढ्या प्रयत्न केले आहेत. प्रत्येक समाजाच्या, जातीच्या वेगवेगळ्या विशिष्ट पाककृती जपण्यात या स्त्रियांचा मोठा सहभाग आहे आणि हाच दृष्टिकोन अनेक स्त्रियांनी जपला आहे. माझ्या सासूने किंवा माझ्या आईने हा पदार्थ मला असा शिकवला. मी तोच पदार्थ बाहेर खाऊन पाहिला, पण मला तो त्या चवीचा वाटला नाही, म्हणून मी ही पद्धत सुरू ठेवली. आजही मी तो पदार्थ बनवते, असं त्यांचं म्हणणं आहे. यावर टीका करणारे असे म्हणू शकतील की, एवढे पर्याय असताना दगदग कशाला करायची? पण या दगदगीमुळे काही पारंपरिक पाककृती टिकून राहायला मदत होते हे खरं. गरज आहे हे पदार्थ बनवण्याची तसदी घेणाऱ्या स्त्रीला घरातल्या इतरांनी मदत करण्याची आणि ती होत आहे हे ही दिसतंय. पुढच्या पिढीने मात्र या पाककृतींची नोंद आपापल्या घरातील स्त्रियांकडून (अपवादाने पुरुषांकडून) करून घेणं अत्यावश्यक आहे. कुटुंबाची 'कुकबुक्स' विस्मृतीत जाणाऱ्या पाककृती जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

फराळ विकत घेताना त्याचं घरगुती स्वरूप बदलणार नाही याकडेही अनेकांचं लक्ष असतं. याचा फायदा गृहोद्योगांना होतो. पन्नासेक वर्षांपूर्वी 'कुटुंबसखी'सारखे गृहोद्योग सुरू झाले. कामासाठी बाहेर पडलेल्या स्त्रीला या पोळीभाजी केंद्रांची मोठी मदत मिळाली. पोळी–भाजी बरोबरच सणावाराला लागणारे ताजे पदार्थ आणि कोरडा फराळही मोठ्या प्रमाणावर या उद्योगांमध्ये बनू लागला आणि आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक शहरात फराळ बनवणारे गृहोद्योग आहेत. महानगरांमध्ये याचं प्रमाण जास्त आहे. मुंबई, ठाणे, पुणे, कल्याण–डोंबिवली या शहरांत दिवाळी फराळाचा मोठा व्यवसाय आहे. फराळ विकत घेणारे कुटुंब तो बनवणाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक फायदा करून देतं. त्यामुळे मोठमोठे खाद्यव्यावसायिक दिवाळी फराळाच्या व्यवसायात असले तरी अजूनही छोट्या उद्योगांनी बनवलेला, एखाद्या गृहिणीने बनवलेला फराळ आपल्या घरी आणण्यासाठी अनेकजण पसंती देतात.

फराळ विकत आणण्यामागे एक महत्त्वाचं कारण सुटसुटीतपणा हे आहे. आज फराळातील बहुतेक पदार्थ वर्षभर सहज बाजारात मिळतात. त्यांतील वेगळेपणा तसा कमी झाला आहे. त्यात उपाहारगृहात जाऊन किंवा मागवून खाण्याचं प्रमाणही वाढलं आहे. अशा वेळी अनेकजण दिवाळीत थोडेच पदार्थ घरी आणतात. मधुमेह किंवा रक्तदाब यासारखे आजार असलेले लोक या काळात अतिगोड किंवा तळलेले पदार्थ खाणं टाळतात. घरी पदार्थ करायचा तर तो किमान किलोभर तरी केला जातो, बाहेरून विकत घेतला तर पाव किलो पदार्थही आणता येतो. मग पूजेच्या वेळी दाखवायच्या नैवेद्यापुरता फराळ आणणं जास्त सुटसुटीत.आपल्या काही पाककृती वेळ खाणाऱ्या आणि बनवायला सराईत हाताची गरज असलेल्या आहेत. अनारसे फसले, चकल्या भुगा झाल्या, लाडू कड्डक झाले... अशा कथा घरोघरी असतातच. त्या असायलाच हव्यात, कारण मग पदार्थ का चुकला याचं कारण कळलं की पुढे तो नीट बनतो. शिवाय 'मुंबई स्वयंपाकघर'सारखे फेसबुक समूह अशा नवख्या हौशी होमशेफना मदत करायला तयार असतात. पण तरीही वर्षभर घरकाम, नोकरी, मुलं, इतर अनेक कामं करणाऱ्या व्यक्तीला जेव्हा दिवाळीच्या वेळी फराळ बनवण्याची वेळ येते तेव्हा यावेळी अमुकतमुक गोष्ट फसणार तर नाही ना, ही धास्ती असते. सुट्या कमी, वेळ थोडा, साफसफाईची कामं, मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांच्याबरोबरच्या भेटीगाठी या सगळ्यातून राहिलेल्या थोड्या वेळातून फराळ बनवायला एखाददुसरा दिवस असतो. मग मनाला आवडणारा, हाताला जमणारा एखाददुसरा पदार्थ करायचा आणि उरलेलं बाहेरून मागवायचं हा पर्याय अतिशय प्रॅक्टिकल आहे. आजची स्त्री सुपरवुमन असली तरी आपला किताब मिरवण्यासाठी उत्सुक नाही. बघा मी बाकी सगळी कामं सांभाळून पंधरा प्रकारचा फराळही बनवते, हे सिद्ध करण्याची तिला गरज वाटत नाही.आपल्या घरात आनंदसोहळा साजरा करत असताना त्याचे पडसाद जगात इतरत्र उमटायला हवेत. दिवाळी हा असा सण आहे की तो साजरा करण्यासाठी जात, धर्म, पंथ यांची बंधनं न मानता संपूर्ण देश एकत्र येतो. याच भावनेतून आपण घरी दिवा लावू या आणि त्याचा प्रकाश आपल्या आसपासच्या सगळ्या छोट्या उद्योजकांच्या घरी पडेल याची काळजी घेऊ या.

# अटी शिथिल करून नगर-शिर्डी रस्त्याचे काम मंत्री नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती खा.लंके यांचा पाठपुरावा

**पारनेर । प्रतिनिधी**

नगर-शिर्डी रस्त्याचे अनेक वर्षांपासून रखडलेले काम आता अल्प निविदा प्रसिध्द करून अडीच हजार कोटी रूपये खर्चाचा हा प्रकल्प लवरच पुर्ण केला जाईल. हे काम पुर्ण होईपर्यत या रस्त्याची दुरूस्ती करून दळणवळण सुलभ केले जाईल अशी ग्वाही केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी दिली.

नगर-शिर्डी रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी खा. नीलेश लंके हे संसदेत गेल्यापासून मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. शुक्रवारी मंत्री गडकरी यांनी या प्रश्नावर संसदेत निवेदन केले. त्यावेळी त्यांनी हे काम लवकरात लवकर माग लावण्याची ग्वाही दिली. या रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे ही मागणी खा. लंके यांनी केली आहे. त्याचा उल्लेखही गडकरी यांनी आपल्या निवेदनात केला. गडकरी यांनी सांगितले की, नगर-शिर्डी रस्त्याचे नेमके काय झाले माहिती नाही, परंतू या रस्त्याच्या कामाच्या तिनदा निविदा निघाल्या. तीन ठेकेदार पळून गेले. एकाची बॅक गॅरंटी बनावट निघाली. आता पुन्हा दोनच ठेकेदारांनी निविदा भरल्या आहेत. अधिकाऱ्यांनी ही माहीती दिल्यानंतर या निविदा रद्द करण्यात सांगण्यात आले आहे. आता पंधरा दिवसांचे अल्प कालावधीची निविदा प्रसिध्द करून सुमारे अडीच हजार रूपये खर्चाचा हा प्रकल्प पुर्ण केला जाईल.

शिर्डीला भाविक येतात. त्यांना त्रास सहन करावा लागतो त्याचे मलाही दुःख होते आहे. तांत्रीक आणि आर्थिक निकष होते त्यात काही अंशी शिथिलता आणण्यात आली आहे. कारण आणखी ठेकेदार ही निविदा भरू शकतील. हा रस्ता काँक्रीटचा करण्याची मागणी तेथील लोकसभा सदस्यांनी केली आहे. त्याचा अभ्यास करून हे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल. तोपर्यंत खराब झालेल्या रस्त्याची दुरूस्ती करून तो वाहतूकीसाठी योग्य राहील याची काळजी घेण्यात येणार असल्याचे गडकरी म्हणाले.

रस्त्याची निविदा काढल्यानंतर निविदा रकमेच्या पन्नास टक्क्यांपर्यंत कमी त्या भरल्या जातात. हे थांबविण्यासाठी सरकारने काही उपाययोजना कराव्यात. त्यासाठी संबंधित ठेकेदार, अधिकारी यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे अशी मागणी यावेळी सभागृहात करण्यात आली, त्यावरही गडकरी यांनी उत्तर दिले.

पूर्वी मोठ-मोठी माणसे निविदा दाखल करत. त्यासाठीच आता तांत्रीक आणि आर्थिक बाबींमध्ये शिथीलता आणण्यात येत आहे. तसे केल्यामुळे आणखी काही लोक हे काम करू शकतील. ४२ टक्क्यांपासून ५० टक्क्यांपर्यंत कमी निविदा सादर करण्यात येत आहेत. हे थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असून त्यामुळे कामे दर्जेदार होण्यास मदत होईल. काही बंधने आम्ही चांगल्या होतून घातली होती. मात्र त्याला यश आले नसल्याचे गडकरी म्हणाले



# तहसीलदार डॉ.क्षितीजा वाघमारे यांचे शेतरस्ता निर्मितीतील ऐतिहासिक योगदान

## महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने सत्कार

**पारनेर । प्रतिनिधी**



तहसीलदार डॉ. क्षितीजा वाघमारे यांच्या कार्यामुळे प्रशासनाची विश्वासार्हता वाढली असून, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमात तहसीलदार वाघमारे यांनी सांगितले, शेतकरी हा केंद्रबिंदू असून, प्रत्येक शेतात रस्ता पोहोचवणे ही माझी जबाबदारी आहे. शेवटचा रस्ता पूर्ण होईपर्यंत थांबणार नाही. नागरिकांनी यामध्ये सहकार्य करावे.


तहसीलदारांनी ब्रिटिशकालीन शिव पानंद शेतरस्ते खुले करण्यासाठी विविध पातळ्यांवर ठोस पावले उचलली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, ग्रामस्तरीय समित्यांच्या माध्यमातून काम सुरू केले. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेत रस्ते उभारणीसाठी शासकीय परिपत्रक लागू केले.कार्यक्रमात उपस्थित महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी सांगितले, तहसीलदार वाघमारे यांनी आदर्श कार्य पद्धत तयार केली आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करत या ऐतिहासिक कामासाठी पाठबळ द्यावे.यावेळी दादासाहेब जंगले पाटील, राजेंद्र नागवडे, रविंद्र सानप बापू, ड. कडूस पाटील, सचिन शेळके यांसह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास भुमि अभिलेख कार्यालयाचे शिंगाडे , पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे, पंचायत समितीचे बनकर साहेब, तसेच विविध गावांतील शेतकरी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदारांच्या या पुढाकारामुळे श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

# श्री दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन

**राहुरी । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, दिंडोरी प्रणित राहुरी अध्यात्मिक केंद्राच्या वतीने श्री दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र पारायण व यज्ञ याग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आणि गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुरू असून, यात १००८ सेवेकरी सहभागी झाले आहेत.

सोहळ्यात सोमवारी ग्रामदेवता सन्मान व अग्नी स्थापन करून पारायणास प्रारंभ झाला. पुढील कार्यक्रमांत गीताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग आणि रविवारी दत्त जन्मोत्सव व बलि पूर्णहुतीचा समावेश आहे. सोमवारी सकाळी आरतीनंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.



# पाथर्डीचे मुनीर शेख उर्फ मुन्नाभाई आता मोठ्या पडद्यावर

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डीचे सुपुत्र आणि आपल्या सहजसुंदर अभिनयाने लोकांच्या मनावर राज्य करणारे मुनीर



शेख उर्फ मुन्नाभाई यांची मोठ्या पडद्यावर दमदार एन्ट्री होणार आहे. वाया गेलेली पिढी या आगामी चित्रपटात त्यांनी मुलाचे वडील ही महत्त्वाची भूमिका साकारली आहे.

मुन्नाभाई यांनी स्थानिक पातळीवर नाटकं, स्किट्स, आणि विविध कार्यक्रमांतून प्रेक्षकांना खळखळून हसवलं आहे. त्यांच्या नैसर्गिक अभिनयशैलीने आणि विनोदी संवादफेकीने लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतानाच, त्यांनी अनेकदा सामाजिक संदेशही दिला आहे. त्यांच्या कामातून लोकांना विनोदासह भावनिक स्पर्श जाणवतो, जो त्यांचा खास गुण आहे.वाया गेलेली पिढी हा चित्रपट आजच्या पिढीतील संघर्ष, पिढ्यांमधील दरी, आणि कौटुंबिक नात्यांवरील कथा मांडतो. या चित्रपटात मुन्नाभाई एका मध्यमवर्गीय वडिलांची भूमिका साकारत आहेत, जे आपल्या मुलाला योग्य मार्गावर आणण्यासाठी झगडत असतात. त्यांच्या साधेपणात भावनिक ताकद आणि हास्याचा मसाला असेल, अशी माहिती समोर आली आहे.मुन्नाभाईंच्या या पदार्पणामुळे स्थानिक कलावंतांमध्येही नवा उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. वाया गेलेली पिढी चित्रपटाचे ट्रेलर लवकरच प्रदर्शित होणार असून, त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या मनात नक्कीच ठसा उमटवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.पाथर्डीच्या मुन्नाभाईंची ही मोठी झेप त्यांच्या मेहनतीचा आणि नैसर्गिक कलागुणांचा विजय असल्याचं सर्वत्र चर्चिलं जात आहे.

# आदर्श गाव मांजरसुंबा येथे गोरक्षनाथ मंदिरावर कलशारोहण मध्य प्रदेशचे ह.भ.प.त्यागी महाराज प्रमुख पाहुणे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र चैतन्य गोरक्षनाथ मंदिरावर कलशारोहणाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मध्य प्रदेशचे ह.भ.प. त्यागी महाराज यांच्या हस्ते होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्याच्या तयारीसाठी प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला आमदार शिवाजीराव कर्डिले, सरपंच अर्जुन कदम, माजी सरपंच भाऊ कदम, देवस्थानचे उपाध्यक्ष जयराम कदम तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी या सोहळ्यासाठी ह.भ.प. त्यागी महाराज यांना गोरखपूर येथे जाऊन निमंत्रण देण्याचा निर्णय घेतला.कलशारोहणासाठी पंचक्रोशीतील नाथपंथीय भाविक, ग्रामस्थ, तसेच नगर, राहुरी तालुक्यांतील प्रमुख गावांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास महाराष्ट्राचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे. गोरक्षनाथ मंदिराच्या या ऐतिहासिक क्षणासाठी सर्व तयारी सुरू असून, हा सोहळा धार्मिक उत्साह आणि एकात्मतेचा उत्सव ठरेल,अशी आशा व्यक्त होत आहे.

# कृषी विद्यापीठांची निर्मिती शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीच : डॉ.इंद्रामणी मिश्रा

## सरपडोह येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू यांचे प्रतिपादन




**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा घडविण्यासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली असून विद्यापीठातील संशोधन प्रत्यक्ष शेतात अंमलात आणल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रामणी मिश्रा यांनी केले.

सरपडोह (तालुका करमाळा) येथे कृषी संशोधन केंद्र बदनापूर, आत्मा करमाळा व जिद्द शेतकरी गटाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनामुळे फार्मर कप स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांनी तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला पाणी फाउंडेशनचे सीईओ सत्यजित भटकळ, कृषी अधिकारी डी. एल. मोहिते, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, तसेच कृषी संशोधन केंद्र बदनापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दीपक पाटील, डॉ. किरण जाधव, डॉ. ज्ञानदेव मुटकुळे, डॉ. विष्णू गित्ते आणि डॉ. प्रशांत सोनटक्के उपस्थित होते. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. नंदकुमार कुटे व डॉ. अनिल दुर्गुडे यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात शेतकरी गटांनी आपले अनुभव शेअर केले, तर फिसरे व सरपडोह येथील तुरीच्या प्लॉटची पाहणी करण्यात आली. पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन आशिष लाड यांनी केले. या कार्यक्रमाला तालुक्यातील ३५ शेतकरी गटांचे ४०० सदस्य उपस्थित होते. शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग व विज्ञानाधिष्ठित शेतीमुळे तालुक्याच्या कृषी क्षेत्राला नवा आयाम मिळत आहे.

### इतर फळपिक शाळा सुरू होणार

**फळ पिकांसाठी आवश्यक शिक्षण देण्यासाठी लवकरच इतर फळपिकांच्या शेती शाळा सुरू केल्या जातील, अशी माहिती पाणी फाउंडेशनचे सीईओ डॉ. सत्यजित भटकळ यांनी दिली.**

### एकत्रित तूर विक्रीचा उपक्रम

**शेतकरी गटांनी एकत्रितपणे उत्तम दर्जाची तुर विक्रीसाठी प्रयत्न सुरू केले असून ही उत्पादने बाजारात चांगल्या दराने विक्रीसाठी पाठवली जातील, असे तालुका समन्वयक आशिष लाड यांनी सांगितले.**

# महापालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांचे होणार सर्वेक्षण



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे महापालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येणार आहे. मार्च अखेरीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश मनपा प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले आहेत. दरम्यान, गेल्या २० वर्षात शहरात सर्वेक्षण झालेले नाही. महापालिका अधिनियमानुसार दर पाच वर्षांनी सर्वेक्षण होऊन पुनर्मल्यांकन करणे अपेक्षित आहे. आता हाती घेतलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणामुळे व पुनर्मूल्यांकनामुळे शहरातील सर्व मालमत्तांना कर आकारणी होईल. मार्च महिन्यानंतर नव्या मोजमापांच्या नोंदीनुसार कर आकारणी केली जाणार आहे. यातून महापालिकेचे उत्पन्न वाढेल, असा विश्वास प्रशासक डांगे यांनी व्यक्त केला.

प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी गुरुवारी (ता. १२) रोजी महापालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. महापालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा संगणकीकरण करणे, विविध आज्ञावली विकसीत करुन इतर कामे करणे, यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महापालिका प्रशासनाकडून मे. सी. ई. इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांना कार्यारंभ देण्यात आला आहे. मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कार्पेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महापालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महापालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे.

## पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी महायुतीत रस्सीखेच

# अजित पवार आणि चंद्रकांत पाटलांमध्ये सुप्त संघर्ष,दोन दादांपैकी कोण मारणार बाजी ?

**पुणे (वृत्तसंस्था)**

पुण्याच्या पालकमंत्रीपदावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. पुण्याचे पालकमंत्रिपदासाठी दोन्ही नेते आग्रही असल्याने महायुतीमध्ये मंत्रिपदावरून मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्याकडे पुण्याचे पालकमंत्रिपद होते. आताच्या सरकारमध्ये देखील त्यांनाच मिळणार की भाजप चंद्रकांत पाटलांना पुण्याचे पालकमंत्री करणार याकडे सध्या लक्ष लागले आहे.२०१९ मध्ये अजित पवार महाविकास आघाडीमध्ये होते. त्यावेळी अजित पवार उपमुख्यमंत्री देखील होते आणि पुण्याचे पालकमंत्री देखील होते. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाविकास आघाडीचे सरकार गेले आणि महायुतीचे सरकार आले. यामुळे अजित पवारांकडे असलेले पुण्याचे पालकमंत्रिपद देखील गेले. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील बनले. त्यानंतर अजित पवारांनी देखील बंड करत पक्ष आपल्या नावावर करत महायुतीमध्ये सामील झाले.

अजित पवार महायुतीमध्ये आल्यावर त्यांनी पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रह केला आणि त्यांना पालकमंत्रिपद देण्यात आले. चंद्रकांत पाटलांना सोलापूरचे पालकमंत्रिपद देण्यात आले. जेव्हा चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री होते तेव्हा देखील अजित पवारांनी जिल्ह्याच्या प्रशासनावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच अजित पवार मूळ पुण्याचेच असल्याने त्यांचा पुण्यातील प्रशासनावर पूर्वीपासूनच दबदबा राहिला आहे.अजित पवार पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, पुण्यातील राजकारण हे प्रामुख्याने सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांचे साखर कारखाने तसेच सहकारी संस्था आहेत. त्यामुळे पुण्याचे पालकमंत्री होणे हे अजित पवारांसाठी महत्त्वाचे आहे. अजित पवार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आमदारांना निधी देखील उपलब्ध करून देतात. मात्र, आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आहेत त्यामुळे पुण्याचे पालकमंत्रिपद कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील मिळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.



## जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना मोठा धक्का;शिबलापूरच्या सरपंचाचे पद रद्द

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील शिबलापूर गावचे सरपंच प्रमोद बोंद्रे यांचे जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी सरपंच पद आणि सदस्य पद देखील रद्द केले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

प्रमोद बोंद्रे हे कॉंग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांने समर्थक असल्यामुळे माजी मंत्री थोरात यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.याबाबत दिपक रक्टे यांच्या तक्रारीवरुन मिळालेल्या माहितीनुसार, शिबलापूर ग्रामपंचायतीच्या संरपच पदाच्या निवडणुकीत प्रमोद बोंद्रे हे निवडुन आले होते. त्यानंतर प्रमोद बोंद्रे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला असल्याचा गंभीर आरोप करत त्यांचे सदस्यत्व अपात्र करावे असा अर्ज महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम प्रमाणे विवाद जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात




आला होता. त्यामुळे सरपंच प्रमोद बोंद्रे यांना लेखी म्हणणे मांडण्यास सांगितले असता त्यांनी ग्रामपंचायतीने कायदेशीर प्रक्रिया पार पाडली असल्याची माहिती दिली. तर, याबाबतचा अहवाल संगमनेर पचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी दिला होता. त्या अहवालानुसार दोघांचे ही लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आले होते.

तक्रारदारांनी युक्तीवादा दरम्यान प्रमोद बोंद्रे यांचे सदस्यपद रद्द करावे अशी मागणी केली होती. त्यानुसार ग्रामपंचायत अधिनियम व तरतूदीनुसार प्रमोद बोंद्रे यांचे सरपंच पदासह सदस्य पद देखील अपात्र ठरवण्यात आले आहे. असे आदेश जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी काढल्याची माहिती मिळाली आहे.दरम्यान तक्रारदारांच्या बाजूने ड. स्वप्नील काकड यांनी काम पाहिले. तर बोंद्रे यांना या निकालाबाबत पुढील १५ दिवसांच्या आत नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे अपिल करता येणार आहे.

न्याय व्यवस्थेवर आमचा पुर्ण विश्वास असुन विभागीय आयुक्तांकडे मी दाद मागणार आहे. तसेच हार न मानता न्यायालयीन लढा आपण शेवटपर्यंत लढणार असल्याची प्रतिक्रिया प्रमोद बोंद्रे यांनी दिली आहे.

## जलसंधारण कामांमुळे खडकेवाके वृक्ष संपदेने बहरले

**राहाता | प्रतिनिधी**

तालुक्यातील खडकेवाके गावात कृषी विभाग, जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग व लोकसहभागाच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे झाल्याने गावातील पाण्याच्या स्रोतात वाढ झाली असून गावातील परिसर नैसर्गिक वृक्ष संपदेने बहरून गेला आहे.

राहाता तालुक्यातील जिरायत भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खडकेवाके या सुमारे तीन हजार लोकवस्तीच्या गावात शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून १०० हेक्टर क्षेत्रावर बांध बंधिस्तचे कामे करण्यात आली आहेत. जिल्हा परिषद पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून गावातून वाहणाऱ्या कात नदीवर ३५ लाख रूपये खर्च करून ७ बंधाऱ्यांची कामे करण्यात आली. यामुळे गावातील शेतीक्षेत्रात असलेल्या विहीरींच्या पाणी पातळीत वाढ झाली.कात नदीवर असलेल्या



जून्या साठवण तलावातील गाळ काढण्यासाठी लोकसहभागातून तलाव खोलीकरण मोहीम राबविण्यात आली. यामुळे आज गावालगत असलेल्या तलावात सुमारे २५ लाख लीटर पाण्याची साठवण झाली आहे.

गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी ही पायपीट करावी लागत होती, आज जलसंधारणाच्या झालेल्या कामांमुळे गावातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून बंद पडलेल्या हातपंपांना पाणी आले आहे. नागरिकांना पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. एकेकाळी शेतात फक्त खरीप पीके घेतली जात होती आज गावात रब्बी व नगदी पीके घेतली जात असून ऊस, सोयाबीन पीक क्षेत्रात वाढ झाली आहे.

## अहमदनगरमल्लखांब वयोगासेंटरच्या खेळाडूंची शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर :नगर –आजपासून ते १३ डिसेंबर २०२४ पर्यंत उज्जैन मध्य प्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी अहमदनगर मल्लखांब व योगा सेंटरच्या एकूण ३ खेळाडूंची निवड झाली आहे.१४ वर्षाखालील गटात विहान कालीप्रसाद चंद्रात्रे व १७ वर्षाखालील गटात दिग्विजय श्रीकांत निंबाळकर व देवदत्त विशाल चोरगे यांची सीबीएससी संघात निवड झाली आहे. हे खेळाडू सुमारे ४ वर्षांपासून मल्लखांबाचा सराव करतात.काळ ते नगरहून उज्जेनला रवाना झाले , यावेळी त्यांना अनेकांनी शुभेछया दिल्या.

या खेळाडूंना संस्थेचे मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे व प्रशिक्षिका प्राजक्ता दळवी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

## साकुर येथे ब्रह्मलिन माणिकगिरी महाराज व बिरोबा महाराज अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर :संगमनेर तालुक्यातील साकुर येथे ब्रह्मलिन माणिकगिरी महाराज व बिरोबा महाराज अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तनास माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी ह.भ.प दत्तगिरी महाराज यांचा सत्कार केला व त्यांच्या किर्तनाचा लाभ घेतला.

ह.भ.प. दत्तगिरी महाराज यांच्या प्रमुख किर्तनाने हा सप्ताह संपन्न झाला. या सप्ताहाची सांगता आज भक्तीमय वातावरणात व दत्तगिरी महाराज यांच्या मंत्रमुग्ध किर्तनाने झाली. या सप्ताहाची परंपरा ते पुढे घेऊन जात आहे, याचा मनापासून आनंद आहे.या सप्ताहाची प्रचिती दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हा



सप्ताह साकुरकरांनी घ्यावा अशी इच्छा मी मागील वरंवडीच्या सप्ताहात व्यक्त केली होती. सर्व साकूरकर आणि लहानु पाटील खेमनर, शंकरपाटील खेमनर व इंद्रजीत यांच्या सर्व सहकाऱ्याच्या मेहनतीने हा सप्ताह सुंदर पद्धतीने संपन्न झाला.

वारकरी संप्रदायाची थोर परंपरा शेकडो वर्षांपासून सुरू आहे, ही परंपरा पुढे नेण्याचे काम हरिनाम सप्ताहाच्या रूपाने पुढे जात असते.साकुर आणि परिसरातील सर्व जनतेचे मी मनापासून आभार मानतो कायम स्मरणात राहील असा हा अविस्मरणीय सप्ताह येथे संपन्न झाला.

महाराज, तुमच्या रूपाने वारकरी संप्रदायाची ही ज्ञानगंगा संतांच्या मुखातून आलेल्या तत्त्वज्ञानाची अशीच पुढे चालत राहावी आणि तीचे गंगारूप पुढे जाऊन मानवतेच्या सागराला मिळावी. जगामध्ये वारकरी संप्रदायाचा सर्वांना बरोबर घेण्याचा, जाती–धर्माच्या विरहित काम करणारा हा विचार जनमानसात रुजावा, ही प्रार्थना या निमित्ताने मी इथे ब्रम्हगिरी महाराज यांच्या चरणी करतो.असे माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी आपल्या वाणीतून मत व्यक्त केले

# जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचा हस्ते ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन शुभारंभ

**अकोले | प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. देशासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी श्री.सालीमठ यांनी केले.

कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उप विभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले , श्री साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप भोसले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लिडर वि.ल. कोरडे (निवृत्त) आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, जिल्ह्यात सैनिक आणि माजी सैनिकांची साधारण १४ हजार कुटुंबे आहेत. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ध्वजदिन निधी संकलन महत्वाचे आहे. यावर्षी २



कोटी ८० लाखाचे उद्दिष्ट असले तरी ६ कोटीचा निधी संकलित करण्याचे उद्दीष्ट ठेवून प्रत्येकाने यात भरीव योगदान द्यावे. प्रत्येक अधिकारी – कर्मचाऱ्याने एक दिवसाचा पगार ध्वजदिन निधीसाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याने गेल्यावर्षी विक्रमी संकलन केल्याबद्दल जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी,कर्मचारी आणि नागरिकांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केले आहे. सैनिकप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

पद्मश्री पवार म्हणाले, वीर जवान सीमेवर आणि किसान गावातील शेतात देशासाठी कार्य करतो. या दोघांवर देशाची जबाबदारी आहे. देशासाठी सीमेवर लढताना अनेक बांधवांना वीर मरण येते, तर काहींना कायमचे अपंगत्व येते. अशा सैनिकांच्या कुटुंबियांना मदत करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातून अधिकाधिक निधी संकलित व्हावा यासाठी नागरिकांनी योगदान द्यावे आणि माजी सैनिकांना शक्य असेल तिथे सहकार्य करावे. पुढील वर्षी जिल्ह्यातील सरपंचांचे ध्वजदिन निधीला भरीव योगदान राहावे यासाठी आपण पुढाकार घेऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रास्ताविकात श्री. कोरडे म्हणाले, भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुर्नवसनाकरिता सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन करण्यात येते. यात लोकसहभागाला महत्व आहे. सैनिकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नव्या पिढीत राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो. यावर्षी ५ कोटी ८ लाख रुपये अर्थात उद्दिष्टाच्या २७५ टक्के निधी संकलन करण्यात आले आणि २ कोटी १८ लाख रुपयांचा निधी माजी सैनिकांच्या कल्याणासाठी वापरण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मनोहर नरहरी नातू यांच्यावतीने वीर पत्नी कौसल्या एकनाथ कर्डिले यांना एक लाख रुपयांचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. श्री.नातू यांनी सलग दहाव्या वर्षी असा निधी दिला आहे. यावेळी माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक कामगिरीबद्दल विशेष गौरव पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले.माजी सैनिक भाऊसाहेब रावजी पवार यांच्यातर्फे देण्यात येणारा १० हजाराचा निधी वीरपत्नी मिनाबाई भानुदास गायकवाड यांना धनादेशाद्वारे देण्यात आला. ध्वजदिन निधीसाठी १० हजार रुपये योगदान देणाऱ्या श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराज आराधना भक्त मंडळ आणि २ लाख रुपये योगदान देणाऱ्या सन फार्मा प्रा.लि. चा यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार करण्यात आला. सीजी पॉवर संस्थेतर्फे सामाजिक दायित्व निधीतून सैनिकी मुलींच्या वसतिगृहासाठी २५ लाख रुपयाचे काम केल्याबद्दल संस्थेच्या प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी सैनिकांसाठी कार्य करणाऱ्या अक्षय टेमकर आणि ज्ञानदेव शेळके यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, माजी सैनिक, माजी सैनिकांचे कुटुंबीय, वीर पत्नी, वीर माता, वीर पिता आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077